Sakal Times : 22/5/2008

**POWER OF KNOWLEDGE**

# US university confers doctorate on Sharad Pawar

## Recognises his role in reviving agriculture and India-US Knowledge Initiative launched during his tenure

**REPORTER**
reporters@sakaaltimes.com

**Pune:** Union Agriculture Minister Sharad Pawar was conferred an honorary doctoral degree in humanities by the Lawrence Technological University of Southfield, Michigan, US at a ceremony held at Detroit recently.

The doctorate was announced for him taking into consideration his role in policy-making to revive agriculture in India, as well as the India-US Knowledge Initiative launched during his tenure for pioneering research in technology and agriculture between the two nations.

In 1978, Pawar became India's youngest Chief Minister at age of 38.

He is also the president of the Board for Control of Cricket in India (BCCI).

Lawrence Tech University offers over 80 undergraduate, masters and doctoral degree programmes in colleges of architecture and design, arts and sciences, engineering and management.

Founded in 1932, the private university pioneered evening classes 75 years ago.

The 4,500-student university also offers programmes with partner universities in Canada, Europe and Asia.

Lawrence Tech University has been working in India for the last three years and has developed partnership agreements with some Indian universities.

Prominent former students of Lawrence Tech University include Lewis C Veraldi, developer of the original Ford Taurus; Steven A Ballmer, chief executive of Microsoft; Ronald P Knockeart, who invented the laser bar code scanner and pioneered remote keyless door locks for automobiles; and Alfred Taubman, a leading real estate developer in United States of America.



**TOP HONOURS:** Union agriculture minister Sharad Pawar receives doctorate from top brass of Lawrence Tech University

सकाळ ॲग्रोवन २२/५/०८

पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव येथून प्रसिद्ध



अमेरिकेतील डेट्रॉईट शहरात झालेल्या एका कार्यक्रमात लॉरेंस तंत्रज्ञान विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. लुई वॉकर यांच्याकडून मानपत्र स्वीकारल्यानंतर हस्तांदोलन करताना भारताचे कृषिमंत्री शरद पवार.

# अमेरिकेतील विद्यापीठाकडून शरद पवार यांना 'डॉक्टरेट'

**साऊथफिल्ड (मिशिगन, अमेरिका)** : केंद्रीय कृषी, ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरणमंत्री शरद पवार यांना अमेरिकेतील लॉरेंस तंत्रज्ञान विद्यापीठाने मानव्यशास्त्र विषयातील 'मानद डॉक्टरेट' या पदवीने गौरविले आहे. कृषी, शिक्षण, राजकारण, व्यापार आदी क्षेत्रात श्री. पवार यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल या विद्यापीठाने त्यांचा सन्मान केला आहे.

रविवार (ता. १८) डेट्रॉईट शहरात झालेल्या एका कार्यक्रमात श्री. पवार यांनी मानद डॉक्टरेट पदवीचा बहुमान स्वीकारला. यासंबंधीचे वृत्त प्रसारित करताना लॉरेंस तंत्रज्ञान विद्यापीठाने म्हटले आहे, की राजकारण, कृषी, नव्या व्यापारांची निर्मिती, शिक्षण, उद्योग, क्रीडा आदी विविध क्षेत्रांत श्री. पवार यांनी दिलेले योगदान प्रशंसनीय आहे. या क्षेत्रांमध्ये दूरदृष्टीचे धोरण ठेवून देशाची सेवा करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

शिक्षणसंधी उंचावणे, शेतीची उत्पादकता वाढवणे व जागतिक समुदायाचा एक भाग म्हणून भारताचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. तसेच सार्वजनिक सेवा बजावण्यामध्ये उदार आणि कनवाळू व्यक्तिमत्त्व त्यांनी जोपासले. (पान ४ वर)

② दैनिक ॲग्रोवन २२/५/०५

# अमेरिकेतील विद्यापीठाकडून शरद पवार यांना 'डॉक्टरेट'

**(पान १ वरून)** देशाच्या बांधणीत समुदायाचा सहभाग वाढवणे, महिलांना अधिकार मिळवून देणे, विद्वत्ता, संशोधन, उद्योग तसेच सामुदायिक करार, संकटे किंवा आपत्तीच्या क्षणी दिलेला त्वरित प्रतिसाद व त्याबाबत ठेवलेली आस्था आदींमध्ये त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. सार्वजनिक सेवांमध्ये मिळवलेले यश, तसेच आपले राज्य, राष्ट्र आणि जगासाठी काम करण्याच्या त्यागी वृत्तीची दखल घेऊन श्री. पवार यांची मानव्यशास्त्र विषयातील 'मानद डॉक्टरेट' पदवीसाठी निवड केल्याचे लॉरेंस तंत्रज्ञान विद्यापीठाने म्हटले आहे.

श्री. पवार यांच्या कार्याची प्रशंसा करताना विद्यापीठाने म्हटले आहे, की देशातील शेतीचे पुनरुज्जीवन होण्यासाठी कृषिमंत्री म्हणून त्यांनी आखलेल्या धोरणांची मदत झाली आहे. गहू, भात, तेलपिके, कापूस, ऊस आदी पिकांचे उत्पादन त्यामुळे वाढण्यास मदत झाली. अमेरिका व भारत यांच्यातील तंत्रज्ञान संशोधन व कृषी क्षेत्रातील ज्ञानाच्या देवाणघेवाण प्रकल्पात श्री. पवार यांनी केलेल्या प्रयत्नांचे मोठे योगदान आहे. शिक्षण क्षेत्रातील संधी वाढवण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे भारताला माहिती व तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, संगणकीय प्रणाली अशा क्षेत्रांत जागतिक पातळीवर आपली ओळख सिद्ध करता आली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आपत्कालीन व्यवस्थापन संघात आपले नेतृत्व श्री. पवार यांनी सिद्ध केले आहे. महाराष्ट्रातील लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांत झालेल्या भीषण भूकंपात आपद्‌ग्रस्तांना साह्यता मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले काम लक्षात घेण्यासारखे आहे, असेही विद्यापीठाने म्हटले आहे. श्री. पवार यांच्या यशस्वी राजकीय कारकिर्दीचीही विद्यापीठाने प्रशंसा केली आहे.

सकाळ 22/5/2008

## पवारांना डॉक्टरेट

# 'अन्नटंचाईची सुनामी रोखू या'

## अमेरिकेत सन्मान : 'लॉरेन्स टेक' विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' पदवी



डेट्रॉइट : अमेरिकेतील 'लॉरेन्स टेक्निकल युनिव्हर्सिटी'ने केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांना 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' पदवी प्रदान करून गौरविले.

**डेट्रॉईट, ता. २१ :** "अन्नटंचाईच्या जागतिक समस्येची तुलना अर्थतज्ज्ञांनी 'सुनामी'शी केली आहे. राजकीय आणि सैद्धांतिक मतभेद विसरून या समस्येला भिडावे," असे आवाहन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी जागतिक नेत्यांना केले.

चार दशकांच्या यशस्वी सामाजिक जीवनाबद्दल 'लॉरेन्स टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी'ने श्री. पवार यांना 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' पदवीने सन्मानित केले. या निमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमोर त्यांचे व्याख्यान झाले. भारतीय शेतीची सद्यःस्थिती आणि यापुढील वाटचालीचा ऊहापोह करतानाच, शेतीसुधारणेच्या दृष्टीने भारत आणि अमेरिकेकडून सुरू असलेल्या संयुक्त प्रयत्नांचा आढावा त्यांनी घेतला.

जगाची लोकसंख्या २०५० मध्ये ११ अब्जांच्या घरात असेल, याची जाणीव करून देऊन श्री. पवार म्हणाले, "इंधनाचे वाढते दर, अन्नधान्य पिकांचा जैवइंधननिर्मितीसाठी वाढता वापर; तसेच काही देशांनी निर्यात रोखल्याने अन्नटंचाई निर्माण झाली. अन्न आणि शेती संघटनेच्या अहवालानुसार, अन्नधान्याच्या जागतिक साठ्याने किमान पातळी गाठली आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज पूर्ण करण्यासाठी जागतिक नेत्यांनी एकत्रित काम करणे अनिवार्य बनले आहे."

### दुसऱ्या हरितक्रांतीकडे...

भारताच्या स्वातंत्र्यावेळी ३६ कोटी लोकसंख्येपैकी सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून होते, तर सध्या एक अब्ज १२ कोटींपैकी साठ टक्के लोकसंख्या शेतीवर गुजराण करते, अशी माहिती श्री. पवार यांनी दिली.

पान ७ वर ▶

२

Page 7

# 'अन्नटंचाईची सुनामी रोखू या'

▶ पान १ वरून

ते पुढे म्हणाले, "हरितक्रांतीच्या काळातील भरभराटीनंतर नव्वदच्या दशकात भारतीय शेतीची पीछेहाट झाली, ही वस्तुस्थिती आहे. तंत्रज्ञानाचा अतिवापर आणि राज्यांकडून शेतीकडे झालेले दुर्लक्ष ही त्याची कारणे मानली जातात. सद्यःस्थितीत विशेषतः अवर्षणप्रवण क्षेत्रातील शेतकरी अडचणीत आहेत. ऐंशी टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असल्याने अडचणींत भर पडली आहे. मात्र, गेल्या चार वर्षांत उपाय योजण्यात आले असून, दुसऱ्या हरितक्रांतीकडे वाटचाल सुरू झाली आहे."

शेतीला कमी व्याजदरात कर्जपुरवठा, शेती संशोधनासाठी अधिक निधी, शेतमालासाठी नव्या बाजारपेठांची निर्मिती, पीकविमा योजनेची फेररचना आणि पणन कायद्यातील सुधारणांमुळे शेतीला संजीवनी मिळेल, असे ते म्हणाले. औपचारिक शिक्षण ही शिक्षणाची पहिली पायरी आहे, हे लक्षात ठेवून भविष्यातील बदलांना सामोरे जाण्यासाठी व्यक्ती आणि संस्थांनी शिक्षणात सातत्य ठेवण्याची गरज आहे, असे श्री. पवार विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले.

विद्यापीठाचे अध्यक्ष लुईस वॉकर, विश्वस्त डॉ. मरिया वाघ, शिकागोचे कॉन्सुलेट जनरल अशोककुमार अत्री, उद्योगपती प्रल्हाद छाब्रिया, डॉ. सूर्याजी भोसले, डॉ. गायत्री भोसले, सुहास पाटील, स्टीव्ह भोसले व त्यांच्या पत्नी आदी या प्रसंगी उपस्थित होते.

१९३२ मध्ये सुरू झालेल्या 'लॉरेन्स टेक' विद्यापीठाने सायंकाळच्या वर्गांची सुरवात ७५ वर्षांपूर्वी सर्वप्रथम केली. साउथफील्डमध्ये १०२ एकरांमध्ये उभारलेल्या या विद्यापीठाचे अनेक 'ऑनलाइन' वर्ग असून, शेतीपासून अभियांत्रिकीपर्यंत आणि विज्ञानापासून व्यवस्थापनापर्यंत ऐंशी अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहेत. वास्तुविशारद शिक्षणामध्ये हे विद्यापीठ जगात पाचव्या स्थानावर आहे.

लोकसत्ता २२।'



# शरद पवार यांना डॉक्टरेट

**नवी दिल्ली, २१ मे/खास प्रतिनिधी**

चार दशकांच्या सार्वजनिक जीवनात महाराष्ट्र आणि देशाची सेवा करताना बजावलेल्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल केंद्रीय कृषी, अन्न व नागरी पुरवठा मंत्री शरद पवार यांचा रविवारी अमेरिकेतील लॉरेन्स टेक्नॉलॉजिकल विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन गौरव केला. डेट्रॉईट येथील साऊथफिल्ड, मिशिगनच्या लॉरेन्स टेक विद्यापीठात झालेल्या एका शानदार सोहळ्यात पवार यांना विद्यापीठाचे अध्यक्ष लुईस वॉकर यांनी 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' ही सर्वोच्च पदवी प्रदान केली. विद्यापीठाने मानपत्रात सरकार तसेच वाणिज्य आणि शैक्षणिक क्षेत्राचे नेतृत्व करताना शरद पवार यांनी दाखविलेल्या दूरदृष्टीची वाखाणणी केली असून उत्तुंग ध्येय गाठण्यासाठी सहकाऱ्यांना प्रेरित केल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली आहे. ■